(Marathi)

1042
9|ग

1332 11 P


मराठी अनेक कवींची राष्ट्रीय काव्यमाला

# प्रभात फेरी

1332
Prabhat Pheri, Pt 2.

## भाग २ रा

Marathi
2 copies




**पी. बी. पाठक आणि कंपनी.**

महात्मा एजन्सी, सूर्यमहाल, गिरगांव--मुंबई नं. ४

---:०:---

किंमत १ आणा.

NATIONAL ARCHIVES LIBRARY
No. 1332
Date 4.1.72
GOVT. OF INDIA

IMPERIAL RECORD
RECEIVED.
21 NOV. 1930
DEPARTMENT

# प्रभात फेरी संग्रह. भाग २ रा,

## स्वराज्याचा डंका

पद—( चाल हमारा राम प्यारा हैं )

प्रभातीची प्रभा फांके । निशा लपली रवी धाके ॥ धृ० ॥
उठा हो आर्य पुत्रांनो । उठा गे आर्य भगिनींनो ॥ ० ॥
पहा आली शुभ बेळा । नका मिटवूं अतां डोळा ॥ २ ॥
प्रभा फांके स्वराज्याची । विभा उठली पहा रविची ॥ ३ ॥
घोष उठला नौबतीचा । स्वराज्याच्याच प्राप्तीचा ॥ ४ ॥
जीव झाला अधिर भारी । चला जाऊं पुरुष नारी ॥ ५ ॥
जळत आहे जीव आमुचा । ध्यास ध्यावा स्वराज्याचा ॥ ६ ॥
बिड्या तोडा गुलामीच्या । हड्डी मोडा गुलामांच्या ॥ ७ ॥
सर्व कर ते न देण्याचें । शास्त्र पढवा स्वसौख्याचें ॥ ८ ॥
जगीं कोठे न जें दिसतें । असें हें राज्य कीं वसतें ॥ ९ ॥
जळे हो जीव पाहोनी । चढे संताप क्रोधानीं ॥ १० ॥
अनत्याचार हें अस्त्र । पहा करिं या नसे शस्त्र ॥ ११ ॥

जगानें नेत्र लाविले । बघाया युद्ध हें आपुलें ॥ १२ ॥
कधीं पूर्वी नसें झालें । असें हें युद्ध जग बोले ॥ १३ ॥
विजय दावूं करूनीया । अशा युद्धीं जगाला या ॥ १४ ॥
खचु न देतां हिम्मतीला । मदत मागूं खुदा त्याला ॥ १५ ॥
चला रे बालवीरांनो । चला हो वृद्ध थोरांनो ॥ १६ ॥
चला रे हिंद–पुत्रांनो । लढाया हिंद–कन्यांनो ॥ १७ ॥ धृ०

# प्रभात--संदेश

## पद—( धन्य शिवाजी तो रणगाजी )

प्रभात झाली उठा भगिनिंनो निरोप द्यायाला ॥
बंधु निघाले स्वराज्य घेण्या अरिशीं लढण्याला ॥ धृ० ॥
प्रभात–वेळा शुभदा मोठी रम्या ही आली ।
चालुनि आह्मां संधी मधु । माय खूष झाली ॥ १ ॥
आशीर्वादा जग जिंकाया बंधूना द्यावें ।
सत्याग्रही त्यां बनावयाला तुह्मीं सांगावें ॥ २ ॥
धन्य कस्तुरी वृद्धा ललना सरोजिनी धन्या ।
हंसा कमलिनी लीलावति या झाशीच्या कन्या ॥ ३ ॥

धन्य मनी वेन धन्य लक्ष्मीपथि धन्या या साऱ्या ।
राष्ट्रशक्ति या प्रचंड मोठ्या अरिला जिंकूणाऱ्या ॥ ४ ॥
आर्यभूमिचे सुपुत्र तैसे सौभाग्या कन्या ।
शस्त्र न धरितां लढती म्हणुनी साऱ्या त्या धन्या ॥ ५ ॥
लढत मोठी विचित्र आहे इतिहासीं न ऐशी ।
म्हणुनि म्हणति त्यां मिळेल ती हो विजयश्री कैशी ॥ ६ ॥
सशस्त्र अरिशीं अशस्त्र हस्तें लढणें शौर्याचें ।
बिकट खरें परि विजय मिळविती शूर तेच धीरांचे ॥ ७ ॥
स्वकार्य करण्या वीर निघाले निरोप द्या त्यांला ।
आर्य—भगिनिंनो तयार व्हावें लिंबा लोणाला ॥ धृ० ॥

# राष्ट्र-ध्वज व मिठाचा सत्याग्रह

**पद**--( धन्य शिवाजी तो रण गाजी )

उठा मर्द हो धरा अतां तुम्हीं राष्ट्रध्वज हातीं ।
कधीं वेळ ही पुन्हां न येई सुरस्व मागूती ॥ धृ० ॥
अशस्त्र केलें अरिनें तुम्हां खंति न मानावी ।
बहिष्कार तो टाकुनि त्यांना लज्जा आणावी ॥ १ ॥

पूर्वज तुमचे शूर मर्द ते लढले शक्तीनें ।
लढा तुह्मी हो अरिसी आतां मोठ्या युक्तीनें ॥ २ ॥
म्यॉंचेस्टरला हाणुनि पाडा बहिष्कारयोगें ।
लज्जा आणा सरकाराला अनुपमेय त्यागें ॥ ३ ॥
सत्याग्रह तो लवण—मिठाचा करुनि कितिक गेले ।
कारागृहींते गांधिबरोबर जग पाहुनि डोले ॥ ४ ॥
अशस्त्र करांना शास्त्र—पाणि ते मारुनि विजयानें ।
फुगती परि त्या लाज न वाटे त्यांच्या अनयानें ॥ ५ ॥
पटेल, गांधी, नेहरू, नरिमन्, अबास तय्यबजी ।
वीर लढूनी कारागृहीं ते गेले घाहव्वाजी ॥ ६ ॥
मेहेर अल्ली, सम ते किति तरि हजार भरतील ।
आर्यभूमिला स्वतंत्र करण्या लाखो मरतील ॥ ७ ॥
परि न झगडा मिटतो आतां ध्यानीं हें ठेवा ।
स्वातंत्र्याचा, मिटेल जेव्हां मिळेल तो ठेवा ॥ ८ ॥
कधीं वेळ ही पुन्हां न येई सुरसा मागूती ।
उठा मर्द हो धरा अतां तरि राष्ट्रध्वज हातीं धृ० ॥

# महात्माजींचें आवडतें पद

वैष्णव जन तो तेने कहिये जे पीड पराई जाणेरे
परदुःखे उपकार करे तोये, मन अभिमान न आणेरे
सकळ लोकमां सहुने वंदे, निंदा न करे केनीरे
वाच्च काछ मन निश्चळ राखे, धन धन जननी तेनीरे
समदृष्टि ने तृश्णात्यागी, परस्त्री जेने मातरे
जिव्हा थकी असत्य न बोले, परधन नव झाले हाथरे
मोह माया व्यापे नहि जेने, दृढ वैराग्य जेना मनमारे
रामनामशुं ताळी लागी, सकळ तीरथ तेना तनमारे
वनलोभी ने कपटरहित छे, काम क्रोध निवार्यारे
मणे नरसैंयो तेनुं दरशनं करतां, कुळ एकोतेर तार्यारे

## पद

स्वस्थ कसा निजसी । भारता । ऊठ किती निजसी ॥
स्वातंत्र्य रवि उगवे हा बघ । करीं स्वागतासी ॥ धृ० ॥
भूमाता ही विव्हल झाली असह्य परदास्यीं
हाक तियेचि आर्यसुता तुज ऐकूं ये न कशी ॥ १ ॥

अमेरिका इंग्लंड भोगिती अतुल वैभवासी ॥
दुर्दैवि परी हिंद भूमि ही अजुनी परदास्यीं ॥ २ ॥
वृद्ध महात्मा गांधी शौर्ये ठाके युद्धासी ॥
परी पाय ! तूं तरुण भारता उदासीन दिसती ॥ ॥
परसत्ता बहु मदांध झाली करी थैमानासी ॥
कितिक वीर निजपदें तुडविलें उघडीं नयनांसीं ॥ ४ ॥
वल्लभाई, बजाज नेहरू आणिक गांधीसी ॥
कारामारी बळें कोंडिलें सकलही वीरांसी ॥ ५ ॥
स्वातंत्र्यास्तव पेशावर तें रची स्वयज्ञासी ॥
देशभक्तिची ज्वाळा ही बघ चमके आकाशीं ॥ ६ ॥
तोफा बंदुका गोळ्या घेती झेलुन त्हृदयाशीं ॥
स्वातंत्र्याचा घोष करोनी चढती स्वर्गासी ॥ ७ ॥
सत्याग्रह स्वातंत्र्यचरणीं या कपट न कवणाशीं ॥
दुखवुं न कवणा कष्ट भोगितां अर्पुहि स्वतनूसी ॥
धर्मयुद्ध हें अद्भुत मीरा शौर्ये जरि लढसी ॥
स्वराज्य वैभव भोगशील वा ईशपदा चढसी ॥ ९ ॥
ऊठ ! ऊठ ! ! सावध हो आतां त्यजीं आळसासी ॥
रक्त उसळुंदे बाहु स्फुरूंदे धांव संगरासी ॥ १० ॥

---

# पद

चरखा चला चला के । लेंगे स्वराज्य लेगें ॥ धृ० ॥
मलमल जो है विदेशी । आणे को गज मिलेंगा ॥
खादी नहि त्यजोंगे ॥ लेंगे ॥ १ ॥
बहोत्तर करोड रुपियां । जा रहे है ॥
उसकुं बचा बचाके । लेंगे० ॥ २ ॥
चरखेकि घणघणाट । रणभेरि या बजेंगे ॥
अंग्रेज को सुन के । लेंगे० ॥ ३ ॥
या हक्क है हमारा । तनजानसेवी प्यारा ॥
मरणें नही डरेंगे । लेंगे० ॥ ४ ॥
हम सब परेड फौजी । कसान् हमारा गांधी ॥
आज्ञा उसकि लेंगे० ॥ ५ ॥
तेहतीस करोड फौजी । रअ सांथ ए चलेंगे ॥
गांधी हुकुम करेंगे लेंगे० ॥ ६ ॥
चरखा ही तोफ बनेंगे । तकवा बने है बरची ॥
गोलेसे सुत्रके हंम् लेंगे० ॥ ८ ॥

# मर्द बनो

मर्द बनो मर्द बनो, सब हिंदुस्तानी मर्द बनो ॥
सरकारी कानुन चुर करो, परदेशी हुकमत दूर करो दूर ॥ १ ॥
हम मालीक हय अपने घरके, ओ दस्तन दाजी कयों करते ॥
सब बंध करो बंद करो, गुलामी खाना बंध करो, मर्द ॥ २ ॥
आयाथा ओ बनीआ होंके अब रखता हय बंदुक तोपे ॥
पार करो पार करो, पाजीको दरिया पार करो, मर्द ॥ ३ ॥
बहेतर है पेहेने हथ कडीयां, जौहरकी आई है घडीयां ॥
डरने वाले मेनो चुडीया, डुब मरो डुब मरो मुळपाक जलमे डुब मरो ४
अब आग लगी हिंदुस्तानमें, है कोन छूपेगा जो घरमें ॥
नाश करो नाश करो, गोरोके देश नीकाल करो, मर्द ॥ ५ ॥
सब सपुत उठो साथ चलो, ए शासन को बरबाद करो ॥
याद करो याद करो, जलीयां के जुल्मो याद करो, मर्द ॥ ६ ॥
ए नादिर शाही नाश करो, खुद जलके उसके खाक करो ॥
कुद पडो कुद पडो, मैदाने जंगमें उछळ पडो, मर्द ॥ ७ ॥
ए जुल्म नहीं हम सहलेंगे, जालीम को यहासे भगा देंगे ॥
दूर करो दूर करो, भारतसे उसकु दूर करो, मर्द ॥ ८ ॥
सब हिंदुस्थानी मर्द बनो

---

अनेक कवींनीं छापलेल्या पुस्तकांतील संग्राहक मुद्रक व प्रकाशक
पी. बी. पाठक, श्री पांडुरंग वैभव प्रेस, मुंबई नं. ४ सन १९३०

॥ श्रीधन्वन्तरयेनमः ॥

मराठी भाषेत वैद्यकीचा सचित्र प्रचंड ग्रंथ.

वैद्यराज कृष्णशास्त्री भाटवडेकर कृत.

# वैद्यसार संग्रह.

हा ग्रंथ सर डॉ. भालचंद्र यांचे वडील विद्वान वैद्यराज कृष्णशास्त्री भाटवडेकर, वैद्यराज रघुनाथ शास्त्री दाते व आयुर्वेद महोपाध्याय वासुदेवाचार्य ऐनापुरे यांनी उपयुक्त अनुभविक देशी औषधांची माहिती भरपूर देऊन तयार केला आहे. यांत रोगांचें निदान, स्त्रीरोग, बालरोग, यांची चिकित्सा सगळवार दिली असून उत्तमोत्तम रसायनें, कर्मविपाक, अनुपान, गर्भाची व इतर माहिती सचित्र असल्यानें देशी औषधांचा लोकमान्य ग्रंथ संग्रहीं अवश्य ठेवून डॉक्टरांचीं बिलें वांचवा व स्वतःच घरीं वैद्य बना. सवलतीची किंमत रुपये १॥. शिवाय पोष्ट व्ही. पी. खर्च माफ.

## पी. बी. पाठक आणि कंपनी.

महात्माएजन्सी, ठाकुरद्वार नाका,

गिरगांव रोड, मुंबई नं. ४.